बी. डी .काळे महाविद्यालय घोडेगाव.

# उत्पादनविषयक सिध्दांत

# उत्पादन फलन व्याख्या

" किमतींचा विचार न करता एखाद्या उत्पादनसंस्थेकडील उत्पादन घटक किंवा उत्पादन साधनसामग्री आणि त्या उत्पादनसंस्थेचे वस्तू व सेवांचे उत्पादन यामधील विशिष्ट वेळेच्या आर्थिक संबधाला 'उत्पादनफलन' मणतात ."

प्रा . रिचर्ड एच . लेफ्टविच

# उत्पादन फलनाची वैशिष्टये

- ❖ उत्पादन फलनाद्वारे आदानप्रदानाच्या वास्तव घटकांचा परस्परसंबंध व्यक्त होतो .
- ❖ तांत्रिक स्थिती बदल्यास उत्पादन फलन बदलते .
- ❖ उत्पादन फलनाचा विचार करताना विशिष्ट वेळ किंवा काळ गृहीत धरणे .
- ❖ इतर वैशिष्टये

# बदलत्या प्रमाणाच्या सिध्दांताच्या किंवा नियमाच्या व्याख्या

- "उत्पादन घटक समूहांपैकी एका घटकाचे प्रमाण वाढवित गेले तर, विशिष्ट बिंदूनंतर किंवा उत्पादन प्रमाणानंतर त्या घटकाचे प्रथम सीमांत उत्पादन आणि नंतर सरासरी उत्पादन घटत जाते."

  **बेनहॅम**

- "काही स्थिर घटकांच्या तुलनेत, काही बदलत्या घटकांत वाढ केली तर, उत्पादनात वाढ होते□पण विशिष्ट मर्यादेनंतर बदलत्या घटकांचे प्रमाण समान प्रमाणात वाढवूनही त्यापासून एकूण उत्पादनात पडणारी भर कमीकमी होत जाते.

  **प्रा. जॉर्ज स्टिगलर**


- "इतर उत्पादन घटकांची नगसंख्या स्थिर ठेवून एका उत्पादन घटकांची नगसंख्या वाढविल्यास त्या बदलत्या उत्पादन घटकाची सीमांत वास्तव उत्पादकता वाढत जाते."

  **प्रा. केनेथ बोल्डिंग**

# बदलत्या प्रमाणाच्या सिध्दाताची गृहीते

- उत्पादन प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या घटकांपैकी एक घटक बदलता असतो .
- उत्पादन प्रक्रियेतील बाकी सर्व घटक स्थिर आहेत .
- बदलत्या घटकात समान मात्रांनी किंव क्रमशः वाढ होत आहे .
- तांत्रिक स्थिती स्थिर आहे .
- अल्पकाळ .

# बदलत्या प्रमाणाचा नियम




## Schedule of law of variable proportions

| Fixed factor (land) | Var factor (labour) | TP (units) | MP (units) | AP (units) | Phase |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 10 | 10 | 10 | 1st (increasing returns |
| 1 | 2 | 30 | 20 | 15 | to a factor) |
| 1 | 3 | 45 | 15 | 15 | 2nd (Diminishing |
| 1 | 4 | 52 | 7 | 13 | returns to a |
| 1 | 5 | 52 | 0 | 10.4 | factor) |
| 1 | 6 | 48 | -4 | 8 | 3rd (Negative returns |
| | | | | | to a factor) |

# बदलत्या प्रमाणाचा नियमाचे महत्व

- ❖ अर्थशास्त्रातील मुलभुत व महत्वाचा सिध्दांत आहे.
- ❖ उत्पादकांना हा सिध्दांत  मार्गदर्शक ठरतो.
- ❖ बदलत्या संयोगाचा उत्पादनावर काय परिणाम होतो हे अभ्यासता येते.
- ❖ नियोजनाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कोणते तंत्र योग्य ठरेल याचे मार्गदर्शन मिळेल.
- ❖ देशातील बेकारीची समस्या समजून घेण्यास हा सिध्दांत मार्गदर्शक ठरतो.

# प्राप्तीच्या संकल्पना

१. एकूण प्राप्तीः “ उपभोक्ता वस्तू खरेदी करताना वस्तूची किंमत अदा करत असतो. ही किंमत म्हणजे उत्पादकाचे उत्पन्न असते.”

एकूण प्राप्ती □वस्तूची किंमत × वस्तूची विक्रीची नगसंख्या

उदा. समजा ५ रुपये किंमत असलेल्या वस्तूचे एकूण २० नग विकले तर, एकूण प्राप्ती = वस्तूची किंमत × वस्तूची विक्रीची नगसंख्या

१०० = ५ × २०

२. सरासरी प्राप्तीः “ सरासरी प्राप्ती म्हणजे दर नगाची प्राप्ती होय.”

एकूण प्राप्ती

सरासरी प्राप्ती □

एकूण विकलेली नगसंख्या

३. सीमांत प्राप्ती ः “ एका जादा नगाची विक्री केल्यानंतर एकूण प्राप्तीत होणारी निव्वळ वाढ म्हणजे सीमांत प्राप्ती होय.”

वस्तूच्या एकूण प्राप्तीत होणारा बदल

सीमांत प्राप्ती □

वस्तूच्या विक्री परिमाणात होणरा बदल

# स्थिर खर्च

- जो खर्च उत्पादन प्रमाणानुसार बदलत नाही, त्यास स्थिर खर्च म्हणतात. उत्पादन वाढले किंवा घटले तरी हा खर्च वाढत किंवा घटत नाही.
- उत्पादन बंद असेल तरी हा खर्च करावा लागतो. उदा. दीर्घ मुदतीच्या कर्जा वरील व्याज द्यावे लागते, वॉचमनचा पगार द्यावा लागतो.
- जो खर्च स्थिर घटकांवर होतो, त्यास स्थिर खर्च म्हणतात. याच काळात काही उत्पादन घटक उत्पादन प्रमाणानुसार बदलता येत नाहीत, असा घटकांना स्थिर घटक म्हणतात.

# बदलता खर्च

- जो खर्च उत्पादन प्रमाणानुसार बदलतो, त्यास ' बदलता खर्च ' म्हणतात. उत्पादन वाढले असता हा खर्च वाढतो. उत्पादन कमी झाले तर हा खर्चही कमी होतो.

- उत्पादन बंद असते तेव्हा हा खर्च करावा लागत नाही.

- बदलत्या उत्पादन घटकांवर होणारा खर्च तो बदलता खर्च अशीही बदलत्या खर्चाची व्याख्या केली जाते.

# वैकल्पिक खर्च

" एखादया विशिष्ट वस्तुनिर्मितीसाठी एखादा उत्पादक घटक वापरण्याचा वैकल्पिक खर्च म्हणजे नजीकच्या पर्यायी वस्तुनिर्मीतीकरिता तो उत्पादक घटक वापरता न आल्याने गमावलेला लाभ होय."

एखादया वस्तूच्या निर्मितीचा वैकल्पिक खर्च म्हणजे त्या वस्तूऐवजी दुसरी एखादी वस्तू निर्माण करण्याची सोडून दिलेली संधी होय. म्हणूनच वैकल्पिक खर्चालाच 'संधी त्याग खर्च' म्हणतात."

## वैकल्पिक खर्चाच्या संकल्पनेचे व्यवहारिक महत्त्व

- ✓ दुर्मीळ उत्पादन घटकांचा योग्य वापर
- ✓ अर्थव्यस्थेच्या दृष्टीने उपयुक्त
- ✓ नफ्याचे मोजमाप करण्यासाठी उपयुक्त
- ✓ मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करताना उपयुक्त
- ✓ वैयक्तिक दिर्घकालीन स्वरूपाचे निर्णय घेण्यासाठी उपयुक्त

# सरासरी खर्च आणि सीमांत खर्च

१. एकूण उत्पादन खर्च ः

पैशाच्या स्वरूपाात उत्पादनासठी करावा लागणरा एकूण खर्च म्हणजे 'एकूण उत्पादन खर्च ' होय.

२. सरासरी खर्च ः

सरासरी खर्च म्हणजे **दर** नगाचा खर्च होय.

सरासरी खर्च सूत्र □

$$\frac{\text{एकूण उत्पादन खर्च}}{\text{एकूण उत्पादित नगसंख्या}}$$

३.सीमांत खर्च ः

सीमांत खर्चाची संकल्पना ही अतिशय महत्त्वाची संकल्पना आहे. एका जादा नगाच्या उत्पादनामुळे एकूण खर्चात पडणारी निव्वळ भर म्हणजे 'सीमांत खर्च ' होय.

सीमांत खर्च सूत्र ः

$$\frac{\text{वस्तूच्या एकूण उत्पादन खर्चात होणारा बदल}}{\text{उत्पादित नगसंख्येत होणारा बदल}}$$

# दीर्घकालीन खर्च

दीर्घकाळ म्हणजे असा कालखंड की□ज्यात मागणीप्रमाणे पुरवठ्यात बदल करण्यास पुरेसा कालवधी असतो. दीर्घकाळात सर्वच उत्पादक घटक बदलते असतात □त्यामुळे सर्व खर्चही बदलर्त असतात.त्यामुळे अल्पकालीन एकूण खचोप्रमाणे दीर्घकालीन एकूण उत्पादन खर्चाचे स्थिर खर्च आणि बदलता खर्च असे वर्गीकरण होत नाही.

अल्पकाळात एक यंत्रकुलाच्या उत्पादन क्षमतेच्या मर्यादेत उत्पादनसंस्था आपले उत्पादन कमी जास्त करू शकते.दीर्घकाळात मात्र मागणीप्रमाणे उत्पाादन वाढविताना कमी खर्चात उत्पादन करण्यासाठी नवीन यंत्रकूल बसविणे शक्य असते.असी अनेक यंत्रकुले सुचित करणारे अल्पकालीन सरासरी खर्च वक्रांच्या साखळीला स्पर्श कएणारा दीर्घकालीन सरासरी खर्च वक्र असतो.

# अल्पकालीन खर्च

अल्पकाळ म्हणजे असा कालखंड की ज्यात  मागणीप्रमाणे पुरवठ्यात सहजासहजी बदल करता येत नाही किंवा बदल करताना उत्पादनाचे काही घटक स्थिर आणि काही घटक बदलते राहतात असा कालखंड होय.

अल्पकाळाच्या मर्यादेमुळे उत्पादनाच्या काही घटकांत उत्पादन प्रमाणानुसार बदल करण्यास पुरेसा कालावधी नसतो असा घटकांना स्थिर घटक म्हटले जाते. उदा ः यंत्रकूल□कायमस्वरूपाचे व्यवस्थापक इत्यादी□तर काही अल्पकाळात उत्पादन प्रमाणानुसार बदलता येतात. त्यांना बदलते घटक म्हटले जाते.उदा ः कच्चा माल□श्रमिक संख्या इत्यादी. अल्पकाळातील उत्पादक घटकांच्या पुरवठ्याच्या लवचिकतेतील भिन्नतेमुळे काही घतक स्थिर तर काही बदलते राहतात.

# खाजगी खर्च व सामाजिक खर्च

खासगी खर्च म्हणजे व्यक्तिगत खर्च□एका उत्पादनसंस्थेला वस्तूचे उत्पादन करण्यासाठी करावा लागणारा एकूण खर्च होय. त्या उत्पादन संस्थेचे उदि्दष्ट□आकार□निर्णयक्षमता□उत्पादन क्षमताा यांवर हा खर्च अवलंबून असतो. सामाजिक खर्च म्हणजे एका किंवा अनेक उत्पादनसंस्थांच्या उत्पाादनांमुळे समाजाला सहन करावा लागणारा खर्च होय. उदाः अनेक कारखान्यांतून खराब माल बाहेर टाकला जातो.अनेक रासायनिक कारखाने नको असलेली रसायने नदीत सोडतात. त्यामुळे नदीचे पााणी प्रदुषित होते. खारखान्याच्या धुराड्यातून बाहेर पडणा□या धुरामुळे हवेचे प्रदुषण होते.यामुळे त्या कारखान्यावर त्याचा काही परिणाम होत नाही. पण हवा□पाणी□आवज यांच्या प्रदुषणामुळे समाजाच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. सामाजिक आरोग्य धोक्यात येते त्यास सामाज्कि खर्च म्हटले जाते.